## प्रारुप

**मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी, सर्व्हे नं. १६५/अ/१ए अंभोरा गाव, ता. आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एपीआय आणि एपीआय इंटरमेडिऐट्स या प्रस्तावित प्रकल्पाकरिता दिनांक ३०/१०/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी, (प्रस्तावित स्थळ) सर्व्हे नं. १६५/अ/१ए अंभोरा गाव, ता. आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत.**

मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी, सर्व्हे नं. १६५/अ/१ए अंभोरा गाव, ता. आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एपीआय आणि एपीआय इंटरमेडिऐट्सचा नविन प्रकल्प या प्रस्ताावित प्रकल्पाकरिता दिनांक ३०/१०/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी, (प्रस्तावित स्थळ) सर्व्हे नं. १६५/अ/१ए अंभोरा गाव, ता. आष्टी, जि. बीड, महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. प्रकाश आ. पाटील,
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, बीड,
जि. बीड. — अध्यक्ष.

२) श्री. अनिल ज्ञा. मोहेकर,
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. — सदस्य.

३) डॉ. योगिनी अ. बाळंखे
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, जालना. — समन्वयक.

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यवाही सुरु केली. त्यांनी पर्यावरण वने व हवामान वन मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली अधिसूचना क्र. एस.ओ.१५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिसूचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ अनुसार मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी, सर्व्हे नं. १६५/अ/१ए अंभोरा गाव, ता. आष्टी, जि. बीड, यांनी प्रस्तावित केलेल्या एपीआय आणि एपीआय इंटरमेडिएट २३९४ टन प्रती वर्ष क्षमतेंच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी सदर पर्यवरण विषयक जाहीर लोक सुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. नंतर त्यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारची अधिसुचना क्र. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ आणि सुधारित अधिसूचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ यातील तरतुदी

आणि प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांचे पर्यावरण विषयक सल्लागर, मे. गोल्डमिंच इंजिनिअरिंग सिस्टीम्स प्रा.लि., ठाणे यांच्या मार्फत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाला सोबत जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ते म.प्र.नि.मंडळाने दि. २९/०९/२०१९ रोजीच्या डेली टाईम्स ऑफ इंडिया(इंग्रजी) व दि. २८/०९/२०१९ रोजीच्या दैनिक सकाळ(मराठी) या वर्तमन पत्रामध्ये नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण विषयक मंजुरी घेण्यासाठी अवलंबण्यात येणा-या पध्दतीचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की एपीआय आणि एपीआय इंटरमेडियट्स चा नविन प्रकल्प सदर अधिसुचनेच्या ५(F) 'अ' या श्रेणीमध्ये मोडतो. तसेच या प्रकल्पास भारत सरकार, नवी दिल्ली ची पर्यावरण विषयक मंजूरी लागते. म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोकसुनवाणी घेणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की सदर अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील कार्यकारी सारांश यांच्या प्रती आष्टी तालुक्यातील संबंधीत ग्रामपंचायत जसे, अंभोरा, धानोरा, अंबेवाडी, पिपरखेड, वाघळुज, दौलवड साळेवड, नांदूरगाव तसेच विविध शासकीय कार्यालये जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद, तहसील कार्यालय, बीड, जिल्हा परिषद कार्यालय, बीड आणि जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, बीड, इ. ठिकाणी अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या होत्या आणि सदर प्रकल्पाबाबत कुणाच्या काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमान पत्रामध्ये सदर प्रकल्पाबाबतची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत नोंदवावे असे आवाहन करण्यात आले होते, त्या अनुषंगाने म.प्र.नि.मंडळ कार्यालय, जालना येथे आज पर्यंत कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही. त्यांनी सांगितले की जर कुणाला त्यांच्या सुचना, आक्षेप नोंदवायचे असतील तर ते आज या ठिकाणी मौखिक अथवा लिखीत स्वरुपात नोंदवू शकतात. त्यांनी विनंती केली की फक्त पर्यावरण संबंधीत प्रश्न विचारु शकतात ज्यांचे प्रकल्प प्रवर्तक हे समाधानकारकरित्या स्पष्टीकरण करतील व त्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेतल्या जाईल आणि ते सदर जाहीर लोकसुनावणीच्या व्हिडियो शुटींग सहीत पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथे पुढिलआवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर केले जाईल. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबतचे सादरीकरण करावयास विनंती केली.

नंतर मे. गोल्डफिंच इंजिनियरिंग सिस्टीम्स प्रा.लि. (NABET Accrediated) चे **श्री. विशाल** जासल, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाचा तपशिल पर्यावरणीय प्रदूषण योजना उपकरणे व करण्यात येणाऱ्या उपाय योजना यांचा समावेश असलेले प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण सुरु केले आणि सांगितले की मे. कन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी यांनी सर्वे नं.१६५/अ/१, अंभोरा गाव, ता. आष्टी,जि. बीड, महाराष्ट्र येथे एपीआय आणि एपीआय इंटरमेडिएट्स निर्मितीचा नविन प्रकल्प प्रस्तावित केलेला आहे. या स्थळाचा निवडीमागील मुख्य कारण म्हणजे बीड जिल्हा हा आयकर नियम १९६२ च्या उप विभाग (५) कलम — ८० - आयबी नुसार श्रेणी 'ब' मधील औद्योगिक दृष्टया मागासलेला जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. सदर कारखाना हा अधिसुचीत औद्योगिक क्षेत्रात स्थित नाही म्हणून त्यास क्षेणी अ अंतर्गत वर्गीकृत केलेले आह, त्या करीता जाहीर लोकसुनावणी घेणे आवश्यक आहे व तज्ञ मुल्यांकन समिती, दिल्ली यांच्या मार्फत त्याचे मुल्यांकन केले जाईल. त्यांनी प्रकल्प स्थळाविषयी विषद केले आणि सांगितले की, प्रकल्प स्थळ हे आंभोरा गांव, ता. आष्टी, जि. बीड येथे स्थित आहे. जवळचे रेल्वे स्थानक अहमदनगर २७ कि.मी. अंतरावर आहे. जवळचा महामार्ग SH-२४२ अहमदनगर-जामखेड रस्त्याला जोडणारा हा १.४ कि.मी.अंतरावर आहे आणि जवळचे विमानतळ औरंगाबाद हे ११० कि.मी. अंतरावर आहे.

त्यांनी पुढे प्रकल्पाच्या ठळक वैशिष्टया बाबत सांगितले की, इआयए अधिसुचना २००६ नुसार सदर प्रकल्प हा (एफ) श्रेणी-अ- मध्ये मोडतो. प्रस्तावित उत्पादन क्षमताही २३९४ टन प्रती वर्ष अशी आहे, एकुण भुखंडाचे क्षेत्र हे १६३८८ चौ.मि. आहे, त्यापैकी ५४२९ चौ.मी. क्षेत्र हरित पट्टा विकास व १६६५ चौ.मी. क्षेत्र पार्किंगसाठी राखीव ठेवलेले आहे, जे शासनाच्या नियमानुसार आहे. सदर प्रकल्पाला लागणारे एकुण पाणी ३६३ घ.मी./दिवस असेल. व पाण्याचा पुर्नवापर केल्यानंतर लागणारे ताजे पाणी १४८ घ.मी/दिवस असेल. सादरीकरणा दरम्यान एका सार्वजनिक सहभागीने सी.एम.डी.विषयी विचारले, त्यावर श्री. जासल यांनी सांगितले की, त्याचा अर्थ क्युबिक मिटर पर डे (घ.मी.प्र.दि.) आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सदर प्रकल्पास १२०० कि.वॅ. विजेची आवश्यकता असेल, लागणाऱ्या एकुण मणुष्यबळाची संख्या १२८ असेल. सदर प्रकल्पामध्ये प्रत्येकी ३ टन प्रती तास क्षमतेचे २ बॉयलर, २ लाख किकॅ/तास क्षेमतेचा एक थर्मोपॅक व ५०० के व्ही ए क्षमतेचा १ डीजी सेट बसविण्यात येईल आणि बॉयलरसाठी कोळसा/ब्रिकेट, थर्मोपॅकसाठी एलडीओ व डिजीसेट साठी एच एस डी इंधन म्हणून वापरण्यात येईल. दोन्ही बॉयलरसाठी ३० मि.उंचीची एक सामाईक चिमणी, थेर्मोपॅकसाठी ३० मि. उंचीची एक वेगळी चिमणी व डीजी सेटसाठी ५.५ मि. उंचीची चिमणी बसविण्यात येईल. सदर प्रकल्पातुन निघणारे एकुण सांडपाणी १९१ घ.मी./दिवस असेल म्हणजेच औद्योगिक सांडपाणी १८५ घ.मी./दिवस व घरगुती सांडपाणी ६ घ.मी./दिवस जे सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणात प्रकियाकृत केले जाईल व प्रक्रियानंतर त्याचा पुर्नवापर करण्यात येईल त्यामुळे सदर प्रकल्प हा झीरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) वर आधारीत असेल आणि कोणत्याही प्रकारचे सांडपाणी कारखाना आवारा बाहेर सोडले जाणार नाही. सदर प्रकल्पाची एकुण भांडवली किंमत २% रक्कम ही कार्पोरेट एन्व्हायरोन्मेंट रिस्पॉसिबीलीही साठी असतील त्यांनी हरित पट्टा व पार्किंग क्षेत्राचा समावेश असलेले प्रकल्पाचे ले-आऊट दाखविले.

श्री. जासल यांनी पुन्हा सांगितले की, सदर प्रकल्पास पाण्याची आवश्यकता ३६३ घमी/दिन असेल व पुर्नवापरानंतर पाण्याची आवश्यकता १४३ घमी/दिन असेल आणि एकुण सांडपाणी निर्मिती १९१ घमी/दिन असेल सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय सुवीधा असलेली सांडपाणी प्रकिया सयंत्रणा बसविण्यात येईल, त्यानंतर प्रक्रिया केलेले पाणी रिव्हर्स ऑस्मॉसिस (RO) मध्ये दिले जाईल, आर ओ परमिएट चे पुनर्चक्रण केले जाईल व आर ओ रिजेक्ट हे बाष्पीभवनासाठी एमइईला दिले जाईल ज्यामुळे झिरो लिक्विड डिस्चार्ज साध्य होईल, तसेच त्यानी इटीपीचा प्रवाह तक्ता दाखविला.

त्यांनी पुढे सांगितले की, सभोवतालच्या परिसरातील वाताव्रणीय स्थिती जाणून घेण्यासाठी त्यांनी प्रकल्प स्थळाचा १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रातील हवा, पाणी, माती व ध्वनी गुणवत्तेचे परिक्षण केले होते आणि परिक्षणात असे आढळले की, सभोवतालच्या परिसरातील वातावणीय स्थिती चांगली आहे व प्रस्तावित प्रक्ल्पामुळे सभोवतालच्या परिसरावर नगन्य असा परिणाम होईल.

**हवा गुणवत्ता**:- सदर भागातील हवेची गुणवत्ता जाणून घेण्यासाठी त्यांनी वेगवेगळी ठिकाणे निवडली होती, जसे भातोडी, पारगांव, धानोरा, आंबेवाडी, चिकोडीप्पटी, पिपरखेड, आठवडं, अंभोरा आणि त्यात असे आढळुन आले की, सदर भगातील हवेची गुणवत्ता म्हणजे **PM१०**, **PM२.५**, So2, NOx यांचे प्रमाण NAAQS ने निर्धारित केलेल्या मानकांच्या आत आहे.

**भूपृष्ट जल गुणवत्ता**:- सदर भागातील भूपृष्ट जलची गुणवत्ता जाणून घेण्यासाठी त्यांनी धानोरा, भातोडी, जाम, उंदरखेड, सालेवडगांव व अढवड अशा वेगवेगळ्या ठिकाणचे पाण्याचे नमुणे संकलीत केले होते आणि असे आढळुन आले की निकषानुसार ठरविण्यात आलेल्या परवानगी परवाण्याची मर्यादा ओलांडली गेली

नाही व म्हणून जलयुक्त पृष्टभाग त्यांच्या अंतर्देशिय पृष्टभागाच्या पाण्याच्या मानकांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार (CAT वर्ग ई) त्यांच्या नियुक्त केलेल्या हेतुसाठी योग्य असल्याचे म्हटले जाऊ शकते.

**भूजल गुणवत्ता:-** सदर भागातील भूजल गुणवत्ता जाणण्यासाठी त्यांनी अंभोरा, वाघळुज, चिंचोलीपाटी, दौलवडगांव, अठवड, नांदूर, सालेवडगाव व आंबेवाडी अशा वेगवेगळ्या ठिकाणचे पाण्याचे नमुने संकलित केले होते आणि निरीक्षणाच्या आधारे असे सांगितले जाऊ शकते की वरिल ठिकाणाहुन गोळा केलेल्या पाण्याचे नमुणे IS १०५०० २०१२ बहुतेक मार्गदर्शक तत्वाचे पालन करत असल्याचे आढळले, तथापि टीडीएस काही ठिकाणी मर्यादा ओलांडते, म्हणून प्राथमिक उपचार व निर्जंतुकी करणानंतर पाण्याचा वापर करण्यात यावा असा सल्ला देण्यात येतो.

**माती गुणवत्ता:-** सदर भगातील मातीची गुणवत्ता जाणण्यासाठी पिंपरखेड, साळेवडगांव, चिंकोडीपाटी व अठवड अशा वेगवेगळया ठिकाणचे मातीचे नमुणे संकलीत केले होते आणि असे आढळुन आले की अभ्यास क्षेत्रातील मातीची गुणवत्ता ही चांगली आहे.

**ध्वनी गुणवत्ता:-** ध्वनी गुणवत्तेचे परिक्षण सभोवतालच्या परिसरात प्रकल्प स्थळापासुन १०० मि., १५० मि व ३०० मि. अंतरावर करण्यात आले होते आणि असे आढळुन आले की सदर भागातील ध्वनी पातळी ही निर्धारित मानकांच्या आत आहे.

**जैव विविधतेच्या अभ्यासाचा सारांश:-** सदर प्रकल्पाची जमिन ही पडिक आहे व अभ्यास क्षेत्रात कोणतेही संरक्षीत क्षेत्र नाही. प्रकल्प क्षेत्राचा १० कि.मी. त्रिजेच्या क्षेत्रात कोणतेही राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य आढळले नाही. १० कि.मी. त्रिजेच्या क्षेत्रात कोणतेही दुर्मिळ किंवा धोकयात आलेली वनस्पती व प्राणी आढळले नाही.

**सामाजिक आर्थिक अभ्यास:-** २०११ च्या जनगणने नुसार बीड जिल्हातील आष्टी तालुक्यातीची एकुण लोकसंख्या २४३६०७ एवढी आहे, त्यापैकी ५% लोक शहरी भागात राहतात ता ९५% लोक ग्रामीण भागात राहतात आष्टी तहसिल क्षेत्रातील साक्षरतेचे प्रमाण ७५.३% आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे सदर भागातील लोकांना रोजगाराची संधी मिळेल. खेड्यामधील गरजा व आवश्यकता लक्षात आणून दिल्यास ते कंपनीसाठी अनिवार्य असलेल्या CSR व CER अंतर्गत त्यांचे समायोजन करण्यास मदत होईल.

**हरित पट्टा विकास:-** प्रस्तावित प्रकल्पस्थळी एकुण ८०० झाडे लावली जातील आणि हरित पट्ट्याच्या विकासासाठी प्रदूषण प्रतिरोधक/सहनशिल मुळ प्रजाती निवडल्या जातील.

**श्री. विशाल जासल** यांनी पुढे सीईआर योजने विषयी सांगितले की, सभोवतालच्या परिसरातील गावामध्ये सीईआर अंतर्गत विविध प्रकारचे कार्यक्रम/उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी रु. ४८.५२ लाखांची तरतुद केलेली आहे, जसे जवळच्या गावामध्ये पावसाच्या पाण्याची साठवण करण्यासाठी जन जागृती- रु. ५ लाख, नाले/नद्यांवर छोटे धरण बांधणे, विहिरीचे खोलीकरण, तलाव स्वच्छ करणे यासाठी तांत्रिक व आर्थिक सहाय्य रु. १५ लाख, मुलभूत वैद्यकिय सुविधा सहित रुग्णवाहीका, दवाखाना व मोफत औषधांची तरतुद –रु. १८

लाख, विविध व्यवसाईक अभ्यासक्रमासाठी १२ वी उत्तीर्ण विद्यार्थाची प्रायोजकत्व -रु.१० लाख आणि अहवाल व दस्ताएवजीकरण-रु. ०.५२ लाख अशा प्रकारे कारखना सीईआर साठी रु. ४८.२ लाख खर्च करेल.

सादरीकरणादरम्यान एक सार्वजनिक सहभागींनी प्रस्तावित प्रकल्पामुळे किती लोकांना रोजगार मिळेल व मिळणाऱ्या रोजगारामध्ये स्थानिक लोकांची टक्केवारी काय असेल असे विचारले, त्यावर **श्री. जासल** यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पामध्ये साधारणत: १०० ते १५० लोकांना रोजगार मिळेल व स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जाईल. जोखीम कमी करण्याचे उपाय विषद करतांना त्यांनी सांगितले की, हायड्रोजन प्रक्रियमध्ये अत्याधिक ज्वलनशील हाड्रोजनचा वापर टाळला आहे व त्या ऐवजी लोह आणि आम्लाचा वापर केला जाईल, HCl, HBr, $SO_2$ व अमोनिया गळती शोधणारे यंत्र व स्क्रबर बसविले जातील आणि या प्रक्रियेमध्ये रसायनांचा पर्यावरणाशी संबंध टाळण्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्यात येईल. ज्वलनशील रसायन हाताळणी क्षेत्रात फलेमप्रुफ उपकरणे बसविले जातील व धोकादायक पातळीवर स्टॅटिक चार्जचा संचय टाळण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली जाईल. कंपनी कामगारांना वैयक्तीक संरक्षण साधणे (पीपीई) पुरविले जातील, सुरक्षा शॉवर व डोळे धुण्यासाठी फवारे देखील पुरविले जातील, आपत्ती व्यवस्थापन योजना (डीएमपी) एमएसआयएचसी नियम, १९८९ नुसार तयार केलेली आहे आणि आढळलेल्या जोखीम शमन उपायांची अंमलबजावणी केली जाईल.

त्यांनी इएमपी अर्थसंकल्प विषयी विषद केले आणि सांगितले की, प्रदूषण कमी करण्यासाठी कारखाने विविध पैलूंसाठी अर्थ संकल्पीय तरतुद केलेली आहे, जसे हवा प्रदूषण नियंत्रण (मल्टी सायक्लॉन डस्ट कलेक्टर, बॅगफिल्टर, चिमणी व स्क्रबर) रु. ५० लक्ष, जल प्रदूषण नियंत्रण रु. ६७०.०० लक्ष हरित पट्टा रु. २.०० लक्ष आणि घातक घनकचरा साठवण व विल्हेवाट रु. १० लक्ष म्हणजेच कारखान्याने पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकुण भांडवली किंमत रु. ८५३.०० लाखाची तरतुद केलेली आहे व त्यासाठी वार्षिक आवर्ती खर्च हा रु. २५.५४ लक्ष एवढा असेल.

त्यांनी पुढे प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना या विषयी विषद केले आणि सांगितले की, बांधकाम टप्प्यामध्ये धुळीचे उत्सर्जन कमी करण्यासाठी जमिनीवर पाणी फवारणी केली जाईल. ध्वनी प्रदूषण व सदर भागातील लोकांना होणारा त्रास टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी काम टाळले जाईल. कारखाना चालु असण्याच्या टप्प्यामध्ये (Operational Phase) योग्य ती काळजी घेतल्या जाईल आणि आधि सांगितल्या प्रमाणे त्यांनी सांगितले की, हवा प्रदूषण नियंत्रणासाठी मल्टी सायक्लॉन डस्ट कलेक्टर, त्यानंतर बॅग फिल्टर, चिमणी व स्क्रबर बसविले जाईल, घातक घनकचरा CHWTSDF रांजणगाव येथे पाठविण्यात येईल, जल प्रदूषण नियंत्रणासाठी सांडपाणी इटीपी, आरओ व एमइइ मध्ये प्रक्रियाकृत केले जाईल, पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी ५४२९ चौ.मी. क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्यात येईल, सामाजिक-आर्थिक विकासासाठी रोजगार उपलब्ध करण्यात येईल, अपघात टाळण्यासाठी सुरक्षा प्रणाली व आलार्म बसविण्यात येईल आणि फॅक्टरी ॲक्ट नुसार संपुर्ण खबरदारी घेण्यात येईल.

शेवटी **श्री. विशाल जासल** यांनी सांगितले की, मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स एलएलपी ही सर्व भागधारकांची सुरक्षा व आरोग्य लक्षात घेवून पर्यावरणाची सुरक्षा व शाश्वत उपाय त्यांचे मुलभूत मुल्य आहे. कारखान्याचे अंतिम ध्येय शुन्य अपघात, शुन्य दुखापती व पर्यावरणास शुन्य हानी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यांनी सांगितले की, मे. कॅन्पेक्स लाईफ सायन्स युनिटच्या शमन उपाययोजना व पर्यावरण व्यवस्थापन

आराखडा यांची अंमलबजावणी केल्या नंतर पर्यावरणावर नगण्य परिणाम होईल व प्रल्पाचा देशाला फायदा होईल आणि नंतर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण समाप्त केले.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण समाप्त केल्या नंतर **डॉ. योगिनी बाळंखे** यांनी प्रश्न विचारण्यापुर्वी आपले स्वत:चे नाव व गावाचे नाव सांगावे अशी सार्वजनिक सहभागींना विनंती केली.

जाहीर लोकसुनावणी मध्ये सार्वजनिक सहभागी आणि समिती सदस्य यांनी सदर प्रकल्पा विषयी काही प्रश्न उपस्थित केले व प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार यांनी त्यांची उत्तरे दिली, ती खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री. भाऊ साहेब नानासाहेब लटपटे,** शिवसेना उप-जिल्हाप्रमुख यांनी सांगितले की, हा मतदारसंघ त्याच्याकडे येतो, सदर भागातील शेतकऱ्यांनी त्यांना सदर जाहीर लोकसुनावणीमध्ये बोलावले आहे व त्यांची एक एनजीओ देखील आहे, ती पर्यावरणविषयी काम करते. त्यांनी सांगितले की, मे. गोल्डफिंच इंजिनिअरिंग सिस्टीम्स प्रा.लि. च्या प्रतिनिधीनी केलेले सादरीकरण त्यांनी लक्ष देऊन ऐकले आणि त्यांना नम्रपणे निदर्शनास आणुन द्यावयाचे आहे की, जाहीर लोकसुनावणी व नागरिकापासून सादरीकरणामध्ये बऱ्याचशा बाबी लपविलेल्या आहे, त्या खालील प्रमाणे आहेत.

सदर प्रकल्पासाठी तयार कलेला कार्यकारी सारांश जो त्यांच्याजवळ उपलब्ध आहे, त्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, प्रस्तावित प्रकल्प स्थळावरील माती गुणवत्ता किंचित क्षारिय आहे व ती उगवण आणि पीक लागवडीसाठी योग्य नाही, म्हणजे प्रकल्प सल्लागारांच मत असं आहे की, सदर माती ही लागवडीसाठी योग्य नाही. मे. कॅन्पेक्सच्या रासायनिक उत्पादन युनिटचे स्थानासाठी निवडेलेली जमिन ही एमआयडीसी क्षेत्रामध्ये येत नाही, ते ठिक आहे आणि तो काही विषय नाही. नंतर त्यांनी अन्य बाबी निदर्शनास आणून देण्यासाठी काही वेळ घेतला आणि काही वेळानंतर त्यांनी सांगितले की, काही मुद्दांचा उल्लेख केलेला नाही किंवा ते जाणीवपुर्वक लपविले, त्याबद्दल ते आरोप करु इच्छित नाही, परंतु काही गोष्टी, ज्या लोकांसमोर यायला पाहिजे त्या आल्या नाहीत आणि त्यांच्याकडे एक छोट्या पुस्तीकेचा संदर्भ आहे, परंतु त्यांना त्यामध्ये त्या बाबी सापडल्या नाहीत. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, इआयए अहवालामध्ये पृष्ट क्र. २४४ वर स्पष्टपणे सांगितले आहे ते त्यांनी वाचून दाखविले जसे, "Possible Impact -plants ........................................... exposure to contaminants आणि सांगितले की, सदर प्रकल्प या भागामध्ये पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य नाही.

लगतचे युनिट जे चालु आहे, ज्यामुळे तक्रारी आहेत त्या प्रथम सोडविण्यासाठी त्यांनी सुचविले. त्यांनी सांडपाण्याच्या विल्हेवाटी बद्दल विचारले, त्यावर **श्री. जासल** यांनी सांगितले की, सांडपाणी कंपनीच्या आवाराबाहेर सोडले जाणार नाही, ते प्रकल्पातच प्रक्रियाकृत केले जाईल व निर्माण होणारा घातक घनकचरा पूढिल विल्हेवाटीसाठी रांजणगाव येथे पाठविण्यात येईल. त्यांनी सांगितले की, ते धानोरा गावाहुन आलेले आहेत, परंतु पुस्तीका (जाहीर लोकसुनावणी संबंधी कागदपत्रे) ही धानोरा, साळेगाव, इ. अशा ८ ग्रामपंचायतींना पाठविलेली नाही, तथापि सार्वजनिक सहभागींनी सांगितले की त्यांना अशा प्रकारची पुस्तिका मिळालेली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांना सार्वजनिक सुचना मिळाली, परंतु पुस्तिका म्हणजे कार्यकारी सारांश मिळला नाही आणि पुस्तिका मिळाली नाही. त्यांवर **डॉ. बाळंखे** यांनी त्यांना पुस्तिकेची पोचपावती दाखविली आणि सांगितले की, पुस्तिका घेतल्यानंतरच संबंधीत व्यक्तिने पोचपावती दिलेली आहे. त्यानंतर श्री. लटपटे यांनी सांगितले की, त्यांनी त्यांचे म्हणणे म.प्र.नि.मंडळाच्या

अधिकाऱ्यांसमोर ठेवले आहे व ते मान्य करायचे किंवा नाही हा त्यांचा मुद्दा आहे. त्यांनी पुढे सांगितले की, लगतच्या काराखान्याने पर्यावरणासाठी उपाय केलेले नाहीत आणि नागरिकांना सदर कारखान्याच्या प्रवेशद्वारात प्रवेश नाही. त्यांनी सांगितले की कारखान्याने बोअरवेल मधुन जमिनीत पाणी सोडले अशी त्यांच्याकडे माहिती आहे, ज्यामुळे लोकांना मोठ्या प्रमाणावर त्रास होईल. प्रकल्प अशा प्रकारे बसवा की प्रक्रिया केलेले पाणी पिण्यासाठी वापरता येईल किंवा पुस्तिकेत काय लिहिले ते वाचा, असे सुध्दा त्यांनी सांगितले, यावर श्री. जासल यांनी सांगितले की, प्रक्रिया केलेले पाणी संपूर्णपणे कुलिंग टॉवरसाठी वापरण्यात येईल आणि पिण्यासाठी नाही. त्यांनी सांगितले की, अहवालामध्ये भुजलविषयी उल्लेख केलेला आहे, जे प्राथमिक उपचार व निर्जंतुकीकरणानंतर पिण्यासाठी वापरले जावू शकते व प्रक्रिया केलेले सांडपाणी कुठेही पिण्यासाठी वापरण्यात येत नाही, ते झाडांसाठी सुध्दा वापरण्यात येत नाही आणि फक्त कुलिंग टॉवरसाठी वापरण्यात येईल. श्री. लटपटे यांनी पुन्हा भुजल संबंधीचा तपशिल वाचुन दाखविला, तो असा "The quality of ground water......................to ensure the quality" आणि सांगितले की, ते एक वकील आहेत, सदर प्रकल्पाच्या परिणामा विषयी लोकांना अवगत करावे असे त्यांनी सुचविले. त्यांनी पुन्हा सांगितले की, प्रत्यक्षात पुस्तिका लोकांपर्यंत पोहोचली नाही व जाणीपुर्वक फक्त तीन कागद दिलेले आहेत, तसेच जाहीर लोकसुनावणीसाठी दवंडी दिली नाही, परंतु बहुतेक सार्वजनिक सहभागींनी सांगितले की, या बाबतीत लोकांना आधीच सुचित करण्यात आलेले आहे. श्री. लटपटे यांनी पुढे सांगितले की, जाहीर लोकसुनावणी अंभोरा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित करायला पाहीजे, परंतु ती कारखान्याच्या प्रस्तावित स्थळी आयोजित करण्यात आली आहे सदर स्थळ गावापासून फार दुर आहे. म्हणून एक महिन्याचा वेळ द्यावा व पुन्हा सुनावणी आयोजित करावी आणि आरडीसी व पर्यावरण अधिकारी यांनी वरील बाबी विचारात घेऊन निर्णय घ्यावा अशी त्यांनी विनंती केली.

**श्री. प्रकाश पाटील,** अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, बीड तथा जाहीर लोकसुनवाणी समितीचे अध्यक्ष यांनी एकावेळी एकाच व्यक्तीने बोलावे अशी सार्वजनिक सहभागींना विनंती केली. तसेच सांगितले की, सुरक्षेसाठी जर काळजी घेतली नाही तर जमिन किंवा पिकावर परिणाम होऊ शकतो असा अहवालामध्ये उल्लेख केलेला आहे, ही एक गोष्ट दुसरी गोष्ट अशी की म.प्र.नि.मंडळाकडे पुस्तिकेची पोचपावती आहे आणि गरज भासल्यास पुस्तिका मिळाली किंवा नाही हे संबंधीत ग्रामसेवकांना विचारु शकता. **श्री. सुखदेव खाकाळ,** माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी सांगितले की, अंभोरा ग्रामपंचायतीला पुस्तिका मिळालेली आहे व ग्रामसेवकांनी सही करुन ती त्यांच्याकडे घेतलेली आहे. जाहीर लोकसुनावणीस उपस्थित असलेले अनेक लोक एकाच वेळी बोलत आहे असे निदर्शनास आल्यानंतर एक वेळी एकाच व्यक्तिने बोलावे अशी श्री. पाटील यांनी पुन्हा विनंती केली.

२) **श्री. सचिन आमले,** जवळचे गांव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवाशी यांनी विचारले की, फक्त सरपंच व ग्रामसेवकच ह्या गोष्टी ठरवू शकतात का, कारण सभोवतालच्या परिसरात शेतकरी राहतात, त्यांच्या पिकांवर दुष्परिणाम होऊ शकतात आणि ते सरपंच व ग्रामसेवकांपर्यंत मर्यादित नाही, परंतु ते सदर भागातील सगळ्या लोकांना व शेतकऱ्यांना माहिती असायला पाहिजे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, अहवालानुसार असे गृहीत धरले आहे की, सदर भागातील शेतजमिन ही नापिक आहे व त्याविषयी कारण विचारले, कारण सभोवताच्या परिसरात शेतजमिन आहे जी

सुपीक आहे, या परिसरात लोक फलोत्पादन (फळबाग) व अन्य पिकांचे उत्पादन घेतात. **श्री. पाटील** यांनी स्पष्ट केले की, **श्री. सचिन आमले** यांच्या शेत जमिनी बाबत कुणाला ही काही आक्षेप नाही. तथापि, जी माहिती दिलेली आहे, ती प्रस्तावित प्रकल्पाच्या गट क्रमांकाशी संबंधीत आहे आणि जमीन मालकाला ती वापरण्याचा अधिकार आहे, त्यानंतर **श्री आमले** म्हणाले की, ते ठिक आहे आणि त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, लगतच्या कारखान्याचे पाणी ज्याचा टीडीएस १०००-२००० आहे व पाझरामुळे सदर भागातील फळबागावर परिणाम होत आहे, यासाठी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कोण देईल. **श्री. पाटील** यांनी त्यांना विचारले की, याबाबतीत काही अर्ज दिलेला आहे किंवा कसे. **श्री. आमले** यांनी सांगितले की, त्यांनी पर्यावरण विभाग/म.प्र.नि.मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय तसचे कारखान्यात वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, कारखाना बाहेरच्या लोकांना कारखान्यात प्रवेशाची परवानगी देत नाही. त्यावर **श्री. पाटील** यांनी स्पष्ट केले की, ती त्यांची सुरक्षेची बाब आहे. **श्री. आमले** जेव्हा लगतच्या कारखान्या बद्दल बोलत होते तेव्हा **श्री. पाटील** यांनी सुचविले की, लगतचा विषय वेगळा घेतला जाईल व प्रस्तावित प्रकल्पाबाबत बोलण्यास विनंती केली. **श्री. आमले** यांनी सांगितले की प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर या गोष्टींचा काही उपयोग होणार नाही आणि जर सद्यस्थितीत परिस्थीती जशी च्या तशी राहीली तर ते प्रस्तावित प्रकल्पास कसे प्रोत्साहन देतील. जर लगतच्या कारखान्याने सगळे नियम पाळले तर सदर भागातील सर्व लोक, शेतकरी, कामगार,वैगेरे काम करण्यास तयार आहेत आणि विकास त्यांच्याच नावावर होणार आहे व ते त्यांनी मान्य केले. परंतु विपरीत परिणाम विचारात घेऊनर निर्णय घेण्यात यावा असे त्यांनी सांगितले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत मराठी भाषेत मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. कारण सदर भागातील बहुतेक लोक निरक्षर आहेत, अशिक्षित आहेत. त्यांवर प्रकल्प सल्लागारांनी सांगितले की संपूर्ण माहितीचे मराठी भाषेत भाषांतर केलेले आहे.

३) **श्री. सुखदेव खाकाळ,** माजी जिल्हा परिषद सदस्य व जवळचे गांव अंभोरा, ता.आष्टी,जि. बीड येथील रहिवाशी यांनी सुचविले की जर लगतच्या कारखान्याच्या काही बारीक/किरकोळ चुका असतील तर अशा चुका प्रस्तावित कारखान्याने दुरुस्त करायला पाहीजे. त्यांनी सांगितले की, लगतच्या कारखान्याने त्यांच्या गावातील ६० ते ७० लोकांना रोजगार दिलेला आहे, कारखान्याने आयटीआय बीगर आयटीआय वैगेरे कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार पगार दिलेला आहे व ते नियमित केले आहे. मध्यंतरीच्या काळात लगतच्या कारखान्याविरुध्द गावकरी व अंभोरा ग्रामपंचायत यांनी पाणी प्रदूषणाच्या समस्यांबाबत जसे विहीरीला कडवट पाणी येणे, वैगेरे अशा थोड्या फार तक्रारी केल्या होत्या. सदर विहीरींच्या पाण्याचे नमुने गोळा केले होते व ते कारखान्यांच्या प्रतिनिधींना बोलावून तपासले होते. ते बोलत असतांना कोणीतरी काहीतरी बोलत होते, परंतु **श्री. खाकाळ** यांनी त्यांना विनंती केली की, बोलणे थांबवा व नंतर बोला किंवा अगोदर बोला. त्या नंतर **श्री. खाकाळ** यांनी सांगितले की, त्यांची साधारणत: ३० ते ४० एकर जमीन ही प्रस्तावित प्रकल्पाच्या जवळ असलेल्या सर्वे नंबर मध्ये आहे आणि त्यांच्या विहीरी देखील खालच्या तसेच वरच्या भागात आहेत, परंतु त्या दिशेला कोणतेही कडवट पाणी किंवा घाण पाणी आढळुन आले नाही. त्यांच्या गावाच्या खालच्या भागात १ ते २ विहीरी व बोअर अस्तीत्वात आहेत जेथे काही प्रमाणात परिणाम झाल्याचा आढळुन आला होता. त्यानुसार सदर विहीरी व बोअरच्या पाण्याचे नमुने गोळा केले होते व ते तपासले होते आणि त्यांचे अहवाल संबंधीत शेतकऱ्यांना कळविणे हे कारखान्याचे कर्तव्य होते.

त्यांनी पुढे सांगितले की, कारखान्यात जाण्यासाठी फक्त एक किंवा दोनच व्यक्तींना परवानगी दिली जाते हे सत्य नाही, परंतु कारखान्यात ज्यांना कुणाला काही काम असेल तर अशी व्यक्ती आवश्यक तो गेट पास घेऊन कारखान्यामध्ये जाते. तसेच त्यांनी सांगितले की, प्रत्येक कामगारांचे पगार हे नियमीत होतात, त्यांची शेत जमीनही कारखान्याला लागुन २५० ते ४०० फुट अंतरावर आहे, त्यांच्या पिकावर कोणताही विपरीत परिणाम झाल्याचा आढळुन आलेला नाही. **श्री.पाटील** यांनी त्यांना विचारले की, सदर कारखाना केव्हा पासून चालु आहे. **श्री. खाकाळ** यांनी सांगितले की, सदर कारखाना साधारणत: २० ते २५ वर्षांपासून चालु असेल म्हणजे सन २००२ पासून. **श्री. पाटील** यांनी सांगितले की, जेव्हा कारखाना मागिल २५ वर्षापासून चालु आहे व सदर कारखान्यात गावातील ६० ते ७० लोक काम करत आहेत, म्हणून सर्व कामगारांना कारखान्यासंबंधी बरीच कल्पना आली असेल. त्यावर **श्री. खाकाळ** म्हणाले की होय, कामगारांना चांगली कल्पना आहे. त्यांनी लगतच्या कारखान्यामुळे होणाऱ्या वायु प्रदूषणाच्या समस्ये बाबत सांगितले आणि चिमणीतील हवेची गुणवत्ता व वासाच्या दुर्गंधीमध्ये सुधारणा करावी अशी कारखान्यास विनंती केली. त्यांनी पुढे सांगितले की, जवळच्या भागातील विहीरीच्या पाण्याचे अहवाल ओके आहेत, असे सांगण्यात आले जे तपासणे आवश्यक आहे, परंतु सदर कारखान्यापासून साधारणत: ५ ते ६ कि.मी.अंतरावर अशा काही विहीरी अस्थीत्वात आहेत ज्यामध्ये पाणी नाही व काही ठिकाणी विहीरीच नाहीत त्यांचे पाण्याचे नमुने आहेत आणि या सगळया गोष्टींची माहिती त्यांच्या जवळ उपलब्ध आहे. म्हणून अशा चुकीच्या अहवालास व माहितीला काही अर्थ नाही. पाणी खरोखरच दुषित झाले तर ते त्याची काळजी घेणे हे कारखान्याचे कर्तव्य आहे, परंतु ज्या व्यक्तिंना विहीरी नाही, बोअर नाही, असे अहवाल त्यांनी ग्रामपंचायत कार्यलयात जतन करुन ठेवले आहेत, म्हणून अशा व्यक्तीचे नाव कसे काय दिले असे त्यांनी विचारले आणि सांगितले की, अशा गोष्टींचे कारण हे गावपातळीवरील राजकारण असू शकेल किंवा एखाद्याला रोजगार दिला नाही वैगेरे त्यांनी निदर्शनास आणून दिले की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुलं रोजगारासाठी १०० ते २०० कि.मी. अंतरावर जातात, जी फार वाईट अवस्था आहे. वाळुज रांजगणांव येथे मोठी औद्योगिक वसाहत (MIDC) मोठे प्रकल्प कारखाने शेतजमीन आहेत, परंतु येथील ग्रामीण भागात अशा प्रकारचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे, त्यामुळे हजारो लोक जगत आहेत व भविष्यात देखील जगतील. त्यांनी सांगितले की, इतरांसारखे त्यांच्याकडे देखील फळबाग, ज्वारी व तुर अशी पिके आहेत, म्हणून जर पिके खरोखर बाधीत झाली तर ते तपासून खात्री करावी व नंतर त्यानुसार काय करायचे ते ठरवावे अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी **श्री. भाऊसाहेब लटपटे** यांचा संदर्भ दिला कुणास ठाऊक ते कुठून आले. त्यांनी सांगितले की, मराठवाडयात बीड जिल्ह्यात औद्यागिक वसाहत नाही, ज्यामुळे लोकंना रोजगाराचे साधन मिळते म्हणून ते चुकीची माहिती मान्य करणार नाहीत आणि त्यांच्या स्वत: सहीत जे खरोखर शेतकरी आहेत, ज्यांना शेतजमीन, विहीर, बोअर, इ. आहेत त्यांनाच चिंता आहे. त्यांनी पुढे जल प्रदूषण झिरो लिक्वीड डिस्चार्ज प्रणाली विषयी सांगितले आणि सादरीकरणात सांगितल्या प्रमाणे प्रस्तावित प्रकल्पासाठी व्यवस्थापन करणे, गावातील लोकांना पात्रतेनुसार रोजगार देणे व अशिक्षित लोकांना देखिल मदत करण्यास त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या संचालक मंडळास विनंती केली. जर सदर प्रकल्पामुळे प्रदूषण किंवा विपरीत परिणाम होत असेल तर कारखाना व्यवस्थापनाने त्याची काळजी घेण्यासंदर्भात विनंती केली.

४) **श्री. सुभाष मुथा,** लगतच्या कारखान्याचे संचालक यांनी सांगितले की, बीड आणि गडचिरोली जिल्हे मध्यवर्ती मागास भाग आहेत. **श्री. पाटील** यांनी त्यांना इटीपी बद्दल माहिती देण्यास सांगितले. **श्री. मुथा** यांनी सांगितले की, त्यांच्याकडे इटीपी आहे, काही विहीरीचे अहवाल देखील त्यांना मिळालेले आहेत ते त्यांच्या लगतच्या प्लांटमध्ये गॅनाडाईन नायट्रेट आणि ५० टक्के हायड्रोजन सायनामाईड चे उत्पादन करतात. सदर उत्पादन प्रक्रियेदरम्यान सांडपाणी निघत नाही, परंतु वॉशिंगचे पाणी/ स्वीपींगचे पाणी निर्माण होते. या निर्माण होणाऱ्या पाण्यासाठी इटीपी बसविलेला आहे. परंतु सद्यस्थितीत वॉशींगची प्रक्रिया बंद केल्या मुळे इटीपीला जाणारे सांडपाणी शुण्य झाले असल्यामुळे इटीपी बंद अवस्थेत आहे. त्यांनी सागितले की, मागास भाग असल्यामुळे काही समस्या असु शकतात आणि त्या ते मान्य करतात, परंतु ह्या लोकांनी केलेल्या सगळ्या तक्रारी खोट्या आहेत. **श्री. पाटील** यांनी सार्वजनिक सहभागी यांनी विचारल्या प्रमाणे बोअर मध्ये सांडपाणी सोडण्याविषयी विचारले, त्यावर **श्री. मुथा** यांनी सांगितले की, त्यांच्या कारखाना परिसरात एकही बोअर नाही व ते म्हणाले की, जेव्हा इटीपी बसविला होता त्यावेळेस ते फ्लोअर वॉशिंग करत होते, परंतु बायोकल्चर च्या कारणास्तव सांडपाणी बाहेर येत असल्यामुळे त्यांनी फ्लोअर वॉशिंग बंद केले व ते कारखान्याच्या कोणत्याही कामगारापासून खात्री करु शकतात. त्यांनी पुढे सांगितले की, सन २००१ मध्ये त्यांनी रु. १४ लक्ष खर्च करुन इटीपी बांधला व त्याची किंमत सध्या साधारणत: रु. ५० लक्ष आहे. **श्री. अ.ज्ञा.मोहेकर,** प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा समिती सदस्य यांनी त्यांना झिरो लिक्विड डिस्चार्ज साध्य करण्यासाठी अस्थित्वात असलेली सांडपाणी प्रकिया सयंत्रणा रिव्हर्स ऑसमॉसिस त्यानंतर मल्टी इफेक्ट इव्हॉपरेटर बसवून अपग्रेड करण्यास तसेच वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी बॉयलरला स्क्रबर बसविण्यास सांगितले. **श्री. मुथा** यांनी सांगितले की, ते लगतच्या कारखान्याचे संचालक आहेत व प्रस्तावित प्रकल्पाचे नाही, त्यांच्या कारखान्याबद्दल प्रश्न विचारल्या जातील हे त्यांना माहित होते म्हणून त्यांना जाहीर लोकसुनावणीस बोलविण्यात आलेले आहे आणि प्रस्तावित प्रकल्पाचे संचालक **श्री. जितेंद्र जैन** आहेत व अन्य एक संचालक **डॉ. जेधे** आहेत ते प्रस्तावित प्रकल्प हाताळतील.

५) **श्री. भाऊ साहेब नानासाहेब लटपटे**, जवळचे गाव बावी काप्सी, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवाशी यांनी सांगिले की, ते शिवसेना उप-जिल्हाप्रमुख आहेत व त्यांच्याकडे सदर मतदार संघ येतो, ते एक वकिल आहेत व त्यांची एक एनजीओ आहे ती पर्यावरण संबंधी काम करते. त्यांनी सांगितले की, **श्री. सुरेश खाकाळ** यांनी त्यांचे नाव घेवून टिप्पणी केली असून, या बाबत जर कारखान्यास त्यांच्या बाबतीत काही आक्षेप असेत तर त्या विषयी कारखान्याच्या प्रतिनिधीने सांगावे, तिसऱ्या व्यक्तीने त्या संदर्भात बोलू नये. त्यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीसाठी पर्यावरणाशी संबंधीत एनजीओ, प्रकल्प बाधीत लोक, येवु शकतात असे जाहीरातीमध्ये उल्लेख केलेला आहे. म्हणून ते जाहीर लोकसुनावणीसाठी आलेले आहेत आणि म्हणून कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीने बोलू नये आणि जर कुणाला काही नाराजी असेल तर ती व्यक्त करावी ते त्याचे स्पष्टीकरण करतील. सर्व प्रथम ते प्रस्तावित प्रकल्पास विरोध करत नाही, परंतु पर्यावरणा विषयी, तांत्रिक दृष्टया पुस्तीका लोकांपर्यंत पोहचल्या नाहीत, लोक नगण्य आलेले आहेत आणि सदर सुनावणी ही ग्रामपंचायत कार्यालयासमोर समोर ओयाजित करायला पाहीजे असे त्यांचे मत आहे.

६) **श्री. रामेश्वर थोरात,** निवृत्त ऐसीपी, रा. अंभोरा/औरंगाबाद त्यांनी सांगितले की, लगतचा कारखाना २००२ पासुन चालु आहे, परंतु कारखाना व्यवस्थापन, ग्रामपंचायत अधिकारी व स्थानिक लोक यांच्यामध्ये येथे संप्रेषण अंतर (Communication gap) आहे, त्यामुळे लोकांची मते खराब झाल्याचे दिसते. त्यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाविषयी जी काही पुस्तिका माहिती वगैरे असेल ती स्थानिक लोकांना अवगत करायला पाहीजे आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दवंडी निश्चितपणे द्यायला पाहीजे किंवा ग्रामसेवक अथवा सरपंच यांनी त्यांच्या गावातील लोकांना त्या बाबत सांगायला पाहिजे. त्यांनी सागितले की, प्रकल्प सल्लागारांनी सांगितल्या प्रमाणे प्रकल्प चांगला आहे आणि ते सुध्दा म्हणाले की, प्रकल्प खरोखरच चांगला आहे, परंतु तो केव्हा चांगला आहे, जेव्हा सगळ्या गोष्टी सर्वांनी एकत्र येवून ठरविल्या तर. कारखान्याने प्रदूषणाविषयी विविध बाबींची काळजी घ्यायला पाहिजे, जसे शेतकऱ्यांच्या शेतातील ज्वारी, बाजरी, इ. चा उतारा, चांगला नाही किंवा ती काळी पडते, पाणी प्रदूषीत होते, वैगेरे. एका सार्वजनिक सहभागींनी आधि सांगितल्या प्रमाणे त्यांनी सांगितले की, कारखान्यात कोणी जायचे किंवा कोणी नाही जायचे हा काही विषय नाही कारण ती कारखाण्याची अंतर्गत बाब आहे. परंतु गावकऱ्यांना काय पाहिजे, किती लोकांना रोजगार मिळेल, वैगेरे या महत्वाच्या गोष्टी आहेत आणि विरोध करायचा म्हणून विरोध करायचा नाही तर किती नुकसान होईल व ते कसे भरुन काढता येईल हे पहायला पाहिजे व त्यांच्या फायद्याविषयी कारखान्याकडे मागणी करणे, त्यांच्या गावातील एम.फार्म, बी.फार्म, बीएससी अशी पात्रता असलेल्या लोकांना रोजगार देणे, इ. असे त्यांनी सुचविले. त्यांनी अगोदर असे सुध्दा सुचविले की, कारखान्यामुळे गावकऱ्यांचे काही नुकसान होणार नाही याची कल्पना कारखान्याने गावकऱ्यांना द्यायला पाहीजे. त्यांनी सांगितले की, कारखाना आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवतील, आणि जर ती चालवली नाही तर भुतकाळात घडले तसे म्हणजे सांडपाणी, घनकचरा, इ. चे प्रश्न उद्भवतील असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यांनी निदर्शनास आणुन दिले की कारखान्याने जवळपासच्या ८ ग्रामपंचायत क्षेत्रातील पाण्याचे नमुने घेतले व त्यांचे जे काय अहवाल आले ते म.प्र.नि.मंडळास पाठविले असे त्यांनी गावकऱ्यांना सांगायला पाहीजे परंतु ते गावकऱ्यांना माहिती नाही जे संप्रेषण अंतर (Communication gap) आहे, आणि म्हणुन फक्त कागद देणे व पोचपावती मिळवणे हे अर्थहीन आहे, व हे ते मान्य करत नाही. म्हणून त्यांनी विनंती केली की, प्रकल्प हा निश्चितच व्हायला पाहिजे परंतु सगळ्या नियमांची अंमलबजावणी करावी. कारखान्यात मजुर पाहिजे, म्हणुन लोकांना रोजगार दिला पाहिजे, कम्युनिकेशन गॅप कमी करायला पाहिजे, १० ते १५ वर्षापासून कारखाण्यात काम करित असलेल्या कामगारांना कायमस्वरुपी पत्र द्यायला पाहिजे आणि लोकांना काही त्रास होवु नये हे देखील पहायला पाहिजे.

७) **श्री. सुभाष मुथा,** लगतच्या कारखान्याचे संचालक यांनी सदर भागात प्रकल्प उभारण्या विषयी सांगितले की, त्यांनी सदर क्षेत्रातच तसेच एमआयडीसी क्षेत्राचा अभ्यास केला व आढळले की, त्यांच्या प्रकल्पाचे स्थळ अहमदनगर पासून फक्त ३० कि.मी. अंतरावर आहे, तेथे काही कायदे आहेत आणि त्यांच्या अनुभवानुसार गावकऱ्यांचे त्यांना संपूर्ण सहकार्य मिळते. ते त्यांचा कारखाना मागिल १७ वर्षापासून चालवित आहे, परंतु काही किरकोळ बाबी वगळता, मोठ्या समस्या उद्भवलेल्या नाहीत. त्यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात अन्य कोणताही रासायनीक कारखाना नाही. त्यांच्याकडे बी.एस.सी., एम.एस.सी. असे पात्र कर्मचारी आहेत आणि असे कर्मचारी त्यांच्या कारखान्यामध्ये अर्ध्या तासात पोहचतात, तथापि एमआयडिसी भागात ४० मिनिटे लागतात. **श्री. पाटील** यांनी

सांगितले की, प्रकल्प उभारण्यासाठी औरंगाबाद हा एक पर्याय होता, त्यावर **श्री. मुथा** यांनी सांगितले की, मुळात ते अहमदनगरचे व सध्या स्थायीक पुण्याचे आणि त्यांना असे वाटते की, एमआयडीसी ऐवजी ग्रामिण भागात प्रकल्प उभारणे काय वाईट आहे. तक्रारीच्या संदर्भात त्यांनी सांगितले की, ते गॅनाडाईन नायट्रेट आणि ५० टक्के हायड्रोजन सायनामाईड चे उत्पादन करतात आणि कोठेही तपासणी केल्यानंतर पाण्यामध्ये जर ह्याचे प्रमाण आढळुन आले तर ते त्यासाठी काळजी घेतील. त्यांनी पुढे सांगितले की, त्यांनी त्यांच्या प्लांटमध्ये इटीपी व आर. ओ. बसविलेला आहे. **श्री. पाटील** यांनी सांगितले की **श्री. मुथा** यांनी त्यांच्या प्लांट बद्दल फार पारदर्शकतेने माहिती दिली तरी सुध्दा त्यांनी सुचविले की, संबंधीतांच्या निवडीनुसार पाणी तपासणे आणि जर लगतच्या कारखान्यातील उत्पादनाचे अंश अहवालामध्ये आढळुन आले तर **श्री. मुथा** त्याची काळजी घेण्यास तयार आहेत.

८) **श्री. बाबासाहेब खाकाळ,** जवळचे गाव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवाशी त्यांनी सांगितले की, त्यांची १२ एकर वरील फळबाग ही ५०० मि. अंतरावर स्थित आहे आणि जर ती प्रदूषणामुळे बाधीत झाली तर नुकसान भरपाई कोण देईल असे त्यांनी विचारले. त्यावर प्रकल्प सल्लागार **श्री. जासल** यांनी स्पष्ट केले की प्रस्तावित प्रकल्पामुळे होउ घालणारे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी त्यांनी मल्टी सायल्कॉन सेप्रेटर ज्याची कार्यक्षमता ९० टक्के आहे व वायु उत्सर्जन करण्यासाठी बॅग फिल्टर आणि स्क्रबर बसविण्याचे प्रस्तावित केले आहे जेणे करुन वायु प्रदूषणाचा काही परिणाम होणार नाही. सांडपाणी प्रक्रियेसाठी इटीपी बसविण्यात येईल आणि कोणतेही सांडपाणी कारखान्याच्या आवारा बाहेर जाणार नाही याची काळजी घेतलेली आहे. निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रकल्पस्थळी प्रक्रिया केली जाणार नाही व तो CHWTSDF रांजणगाव येथे पाठविण्यात येईल. या सर्व बाबींची पुर्तता झाल्या शिवाय त्यांना पर्यावरण विषयक मंजूरी मिळणार नाही. श्री. बाबासाहेब यांनी पुन्हा विचारले, जर काही घडले तर त्यावर श्री. जासल यांनी सांगितले की, त्यांनी संपूर्ण काळजी घेतलेली आहे, त्यामुळे काहीही विपरीत घडणार नाही. श्री. बाबासाहेब यांनी पुढे सांगितले की, प्रस्तावित प्रकल्प स्थळाजवळ १ विहीर आहे जिच्या पाण्याला कडू चव आहे व कारखाना व्यवस्थापनास सदर पाणी पिण्याविषयी त्यांनी विचारले.

९) **श्री. संदिप नानासाहेब आमले,** जवळचे गाव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड यंथील रहिवाशी यांनी सांगितले की, सदर विहीरीचे पाणी कारखान्यामध्ये तपासावें व त्याचे अहवाल गावकऱ्यांना दाखवावे अशी फार दिवसापासूनची मागणी आहे, परंतु कारखान्याने एकही अहवाल दाखविला नाही. त्यांनी पुढे सांगितले की, त्यांची एक ६० वर्षापासुनची विहीर आहे, जी मागील १० वर्षापासुन बंद आहे, ते कारखाना स्थापन होण्यापूर्वी परिसरातील सर्व लोक सदर विहिरीचे पाणी पीत होते, परंतु कारखाना सुरु झल्यानंतर कोणीही सदर विहीरीचे पाणी पीत नाही. परंतू २ कि.मी अंतरावर पाईपलाईन टाकुन सदर विहीरीचे पाणी त्यांच्या शेतीसाठी वापरतात व पिण्यासाठी त्यांना घरुन पाणी न्यावे लागते, परंतु कारखान्याने काही काळजी घेतली नाही. राजकारणाच्या संबंधाने त्यांनी सांगितले की, काही कारखाना अधिकाऱ्यांनी काही व्यक्तींना आश्वासन दिले की, ठराविक उमेदवाराला मतदान दिल्यानंतरच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर अशा व्यक्तींना कारखान्यात कायमस्वरुपी आदेश (Parmanent) देण्यात येतील अशी लोकामध्ये चर्चा आहे आणि त्या अनुषंगाने कारखान्याने ग्रामपंचायत निवडणुकीनंतर अशा व्यक्तींना कायम स्वरुपी आदेश दिले. त्यांनी सांगितले की, अशा उमेदवाराचे नाव ते नंतर सांगतील. श्री. पाटील यांनी त्यांना त्यांचे नाव विचारले त्यावर त्यांनी त्यांचे नाव संदिप नानासाहेब आमले आहे असे सांगितले व अशा निवडणुकीचे रेकॉर्ड उपलब्ध नाही कारण

ते मौखिक होते अशी लोकांमध्ये चर्चा आहे असे सुध्दा त्यांनी सांगितले. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की, सदर भागात शेतकरी हे निरक्षर/अडाणी आहे, त्यांनी असेही सांगितले की, या लोकांना काही सांगायचे असल्यास त्यांना श्री. सुरासे, व्यवस्थापक त्यांना अडकाठी करतात.

१०) **श्री. सचिन आमले,** जवळचे गाव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवाशी यांनी सांगितले की कारखान्याने मागच्या बाजूस संरक्षण भिंत (Compound Wall) बांधलेली नाही त्यामुळे जेव्हा वारा वाहतो तेव्हा कारखान्यातील कचरा सभोवतालच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतावर पसरतो, त्यांमुळे उन्हाळ्यात संध्याकाळच्या वेळी गावकऱ्यांना त्रास होतो हे पहायला पाहीजे. जर कारखान्याचे काम पारदर्शक आहे, तर सदर कारखान्यात एक तरी कायस्वरुपी उमेदवार दाखवा असे त्यांनी सांगितले. सात वर्षापेक्षा जास्त काळ पूर्ण झाला तरी सुध्दा कारखाना कामगारांना पुष्टी पत्र (Confirmation Letter) देत नाही, विम्याच्या बाबीमुळे तांत्रिक काम हे कमी पगारात अतांत्रिक व्यक्तींकडून घेतल्या जात आहे असे त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले आणि विचारले की, जर एखादा अपघात झाला तर त्यास कोण जबाबदार आहे, कारखान्याने किती तांत्रित व अतांत्रिक व्यक्तींना रोजगार दिला व १७ वर्षामध्ये संरक्षण भिंत न बांधल्याचे कारण काय असे सुध्दा त्यांनी विचारले. सादरीकरणामध्ये सांगितल्या प्रमाणे रु. २.० लक्ष हे वृक्षारोपणासाठी खर्च करण्यात येतील असे त्यांनी सांगितले, परंतु गावासाठी काय विकास कामे केली असे त्यांनी विचारले. त्यांनी पुन्हा एखाद्या उमेदवाराला पुष्टीपुत्र मिळाले काय या बाबत विचारले.

११) **श्री. भाऊसाहेब लटपटे,** यांनी सांगितले की, श्री. सचिन आमले यांनी कारखान्यात अर्ज करायलापाहीजे व त्याची पोच पावती घ्यायला पाहिजे आणि नंतर ते पाहतील की कारखाना त्यांना कसा रोजगार देत नाही. कारखाना परिसरातील स्थानिक लोकांना रोजगार द्यावा असा शासनाचा जी.आर. आहे. त्यांनी सांगितले की, ७० टक्के स्थानिक लोकांना रोजगार द्यायला पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की ज्या व्यक्तिकडे पदवी नाही किंवा आवश्यक पात्रता नाही अशा व्यक्तींना रोजगारासाठी कारखान्यात अर्ज करावा आणि कारखान्याने त्यांना योग्य असे प्रशिक्षण दयावे तसेच मिनिमन व्हेजेस अॅक्ट नुसार पगार द्यावा असे सुचविले. या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील निर्णय (Judgement) दिलेला आहे. कारखान्यातर्फे जर कुणाला धमकी देत असेल तर स्थानिक पोलिस स्टेशनला जा अन्यथा सामना व शिवसेना त्यांचेच आहेत.

१२) **श्री. अमोल आमले,** जवळचे गांव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील रहिवाशी यांनी सांगितले की, कारखान्यासाठी अकृषीक जमीन लागते आणि कारखान्याकडे उपलब्ध असलेल्या अकृषिक व शेतजमिनी बाबतचा तपशिल विचारला. त्यावर **श्री. पाटील** यांनी त्यांचे म्हणणे काय आहे असे त्यांना विचारले. श्री. अमोल यांनी सांगितले की, कारखान्याची जमीन ही शेतजमीन आहे, त्यावर **श्री. पाटील** यांनी विचारले, शेतजमीनीत काय अडचण आहे, आणि समजा जमीन ही उद्योगासाठी घेतली व अशा जागेत झाडे लावली तर काय अडचण आहे. **श्री. अमोल** यांनी सांगितले की, काही अडचण नाही. परंतु ते क्षेत्र वाढत होते. त्यावर **श्री. पाटील** यांनी स्पष्ट केले की, उद्योगासाठी क्षेत्रातील जमीन ही उद्योगासाठी वापरायला पाहिजे हे सत्य आहे, परंतु जर ती शेतीच्या उद्देशासाठी वापरली तर काय वाईट आहे, कारण देशामध्ये शेती कुठेही केल्या जाऊ शकते त्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही आणि औद्योगिक उद्देशासाठी परवानगी लागते **श्री. अमोल** यांनी सांगितले की, सायं ६.०० वाजता पासुन पडल्यानंतर तेथे अडचणी असतात, म्हणून त्यांनी संध्याकाळच्या वेळेस सदर स्थळास भेट देऊन पाहणी /तपासणी करावी, अशी विनंती केली, बॉयलर चार्ज करतांना संपूर्ण आकाश काळे

होते, सदर भगातील जमीन जसेच एका शतकऱ्याचे शेत काळे होते असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. पर्यावरण मुद्‍्याच्या संबंधाने **श्री. सचिन** आमले यांनी सांगितले की, सदर कारखान्यापासून पाझर नाही, जे ते मान्य करतात, परंतु जे पाणी ते पितात ते कारखाना अधिकाऱ्यांनी दोन/चार दिवस सलग प्यावे. विहिरीच्या प्रदूषित पाण्याच्या संबंधाने **श्री. मुथा** यांनी स्पष्ट केले की, जर त्यांच्या उत्पादनाचे प्रमाण सदर विहीरीच्या पाण्यात आढळले तर ते मान्य करतील, तथापि त्यांनी सांगितले की, एका व्यक्तीने त्यांच्या विहिरीच्या पाण्याच्या प्रदूषणा बाबत तक्रार होती आणि त्या व्यक्तीच्या विनंती वरुन स्वखर्चाने रु. ४० हजार खर्च करुन त्यांनापिण्याच्या पाण्यसाठी **श्री. मुथा** यांनी बोअर तयार करुन दिली. परंतु सदर व्यक्तीने सांगितले की सदर बोअरला पाणी आले नाही. काही लोक प्रदूषित पाणी पिण्याविषयी बोलत होते, त्यावर **श्री. मुथा** यांनी पुन्हा सांगितले की, सदर पाण्यात त्यांच्या उत्पादनाचे प्रमाण आढळले तर ते त्यास जबाबदार राहतील. त्यांनी सांगितले की, हे संपुर्ण प्रकरण त्यांचे व्यवस्थापक श्री. सूरासे हाताळतात व ते त्या बाबत तपशिलवार सांगू शकतील तेव्हा **श्री. पाटील** यांनी स्पष्ट केले की ती ही बाब नाही, जर ते लोक जे प्रदूषित पाणी पितात ते विहीरीचे पाणी कारखान्यांच्या अधिकाऱ्यांनी प्यावे अशी ती बाब आहे व त्यांनी **श्री. सुरासे** यांना ते पाणी पिऊ शकतात काय असे विचारले, त्यावर **श्री. सुरासे** म्हणाले, होय ते सदर पाणी पिऊ शकतात. **श्री. पाटील** यांनी विचारले की अर्धा/एक कि.मी. अंतरावर कुणाच्या विहीरी स्थित आहे, त्यावर एका सार्वजनिक सहभागिंनी सांगितले की, त्यांची विहीर अर्ध्या कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे. **श्री. सुरासे** यांनी लोकांना विनंती केली की त्यांनी सदर विहीरीचे पाणी चांगल्या ठिकाणी तपासुन अहवाल द्यावेत सदर अहवाल ते कारखान्याला सादर करतील व जर विहीरीचे पाणी खराब आढळले तर ते त्या विहीरीच्या पाण्याचा वापर थांबविण्याची विनंती करतील. त्यावर लोकांना विचारले की, पाणी तपासण्यासाठी चांगली जागा कुठे आहे **श्री. सुरासे** यांनी सांगितले की, चौकशी करुन ते चांगल्या प्रयोगशाळेचे नाव व पत्ता देतील, परंतु **सचिन आमले** यांनी सांगितले की, ते शेतकऱ्यांचे काम नाही. त्यावर **श्री. सुरासे** म्हणाले की, विहीरीच्या पाण्याचे नमुने तपासणी शुल्क कारखान्यातर्फे दिले जातील, परंतु सदर कामासाठी प्रतिनिधी उपस्थित रहायला पाहिजे असे श्री. सचिन आमले यांनी सागितले.

१३) **श्री. सुखदेव खाकाळ,** माजी जिल्हा परिषद सदस्य व जवळचे गांव अंभोरा, ता.आष्टी,जि. बीड येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांची ग्रामपंचायत कारखाना प्रतिनिधीच्या उपस्थितीत तक्रारदार शेतकऱ्यांच्या विहिरीचे पाणी गोळा करतील, त्यांच्या स्थळावर पंचानामा केला जाईल, व ते पाणी प्रयोगशाळेत तपासले जाईल आणि जो काही अहवाल मिळेल तो कारखाना मालकाने स्विकारला पाहीजे आणि जर ते प्रदूषित आढळले तर कारखान्याने त्याची विल्हेवाट लावावी अशी त्यांनी विनंती केली.

१४) **श्री. संदिप नानासाहेब आमले,** जवळचे गांव अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथील रहीवाशी यांनी ८०-९० स्थानिक लोकांना रोजगार दिल्या विषयी गावकऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांनी सांगितले की, ते ठिक आहे परंतु ८०-९० लोक गावच्या बाहेर कुठेही रोजगार करु शकतात, तथापि, त्यांच्या गावात साधारणत: २०० शेतकरी राहतात ती महत्वाची बाब आहे. त्यांनी सांगितले की त्यांच्या विहीरीचे पाणी प्रदूषित झाले, हा काही विषय नाही की कारखान्यातील व्यक्तीने त्यांच्या विहीरीमध्ये आम्लची बाटल वैगेरे ओतुन टाकली, परंतु अर्ध्या कि.मी.च्या परिसरात पाझरामुळे विहीरीचे पाणी प्रदूषित होते, याचा अर्थ असा की फक्त विहीरीचे पाणी नाही तर खालची जमिन देखील

प्रदूषित होत आहे. त्यांनी सागितले की मागिल ४ ते ५ वर्षापुवी त्यांनी व्हिडियो शुटिंग केली होती तसेच छायाचित्रे घेतली होती आणि असे आढळले होते की घाण पाणी बाहेर सोडल्या जात होते व कारखान्याने इटीपी चालविला नव्हता आणि जर चालविला असता तर सन २००२ पासून इटीपीचे दैनंदिन रेकॉर्ड दाखविण्यास सांगितले. त्यांनी सांगितले की, चिमणीचे इंडिकेटर देखील बंद दिसते ही एक महत्वाची बाब आहे. श्री. मुथा यांनी सांगितले की, ज्या व्यक्तिीने ज्वारी काळी पडण्याविषयी तक्रार केली होती ते त्या व्यक्तीच्या घरी जेवायला गेले होते, तेव्हा त्यांच्याकडून ज्वारी घेतली होती ती खाण्यासाठी फार चांगली होती, परंतु श्री. पाटील यांनी सांगितले की तो विषय नाही आणि प्रदूषण टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे, जसे चिमणीची उंची वाढविणे, कचरा कुठेही न टाकणे, इ. असे सूचविले. व **श्री. मुथा** यांनी ते मान्य केले. **श्री. संदिप आमले** यांनी असे निदर्शनास आणून दिले **श्री. मुथा** यांनी गावासाठी अंभोरा फाटा ते अंभोरा गांव या रस्त्याच्या दोन्ही बाजुने एलइडी लाईट बसवून घेण्याचा प्रस्ताव दिला होता, परंतु त्यासाठी काहीही प्रगती आढळुन आली नाही. त्यावर **श्री. मुथा** यांनी स्पष्ट केले की २ कि.मी. पर्यंत विजेचे खांब आणि विज जोडणी सहीत लाईट देण्याचा प्रस्ताव दिला होता, परंतु एमएसइबीने त्यांना सांगितले होते की, औद्योगिक हेतु व्यतीरिक्त वीज गावाला दिली तर कारखान्याची जोडणी कापण्यात येईल, वीजेचे बिल देण्याचा विषय देखील चर्चेला गेला होता, त्यावर **श्री.पाटील** यांनी सोलार एनर्जिचा पर्याय सुचविला, परंतु **श्री. मुथा** यांनी सांगितले की, तो व्यवहार्य नाही. श्री. सुखदेव खाकाळ यांनी सांगितले की श्री.मुथा यांनी वीज देण्याचे आश्वासन दिले होते व ते त्यासाठी तयार देखील होते, परंतु सदर भाग हा ग्रामीण आहे व ग्रामपंचायतीकडे वीजेचे बील देण्यासाठी पैसे नाही म्हणून वीजेच्या ऐवजी त्यांच्या मुलामुलींचे लग्न कार्यक्रम घेण्यासाठी सर्व सोईंनी युक्त असे एक मंगल कार्यालय बांधून द्यावे व मंगल कार्यालय बांधण्याचा खर्च ५० टक्के कारखाना व ५० टक्के ग्रामपंचायतीने द्यावा असे त्यांनी सुचविले होते व **श्री. मुथा** यांनी ते मान्य केले होते. **श्री. पाटील** यांनी अन्य बाबींविषयी विचारले, त्यावर त्यांनी अलिकडेच झाडे लावली त्याप्रमाणे त्यांच्या ग्रामपंचायत परिसरात विकास व पर्यावरणासाठी नियमानुसार झाडे लावुन द्यावे असे **श्री. खाकाळ** यांनी सुचविले, झाडांचे संरक्षण व संगोपन करण्याची जबाबदारी यादीप्रमाणे संबंधीत व्यक्तकडे ठरवून द्यायला पाहिजे, **श्री. खाकाळ** यांनी सांगितले की, त्यांनी पंचायत समितीच्या सहकार्याने सदर भागात ३२०० झाडे लाावली आहेत व ती जगवली आहेत. **श्री. पाटील** यांनी निदर्शनास आणुन दिले की, फळझाडासाठी कृषि विभागाकडे योजना आहेत व अन्य रोपे सामाजिक वनीकरण विभागाकडे उपलब्ध असतात. **श्री. खाकाळ** यांनी सांगितिले की, कारखान्याने झाडांसाठी टँकरने पाणी पुरविले आहे व झाडांच्या खडडयांसाठी पैसे देखील दिले आहेत. **श्री. पाटील** यांनी कारखाना ग्रामपंचायत , वैगेरे वर अवलंबून राहण्यापेक्षा वृक्षा रोपण व त्यांचे संरक्षण याची जबाबदारी ही लोकांनी घ्यायला पाहीजे असे सूचविले. **श्री मुथा** यांनी सांगितले की सदर भागामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुला त्यांनी झाडे लावली आहेत, परंतु अंभोरा येथील रहीवाशी श्री. खाकाळ प्रदिप यांनी झाडे कुठे लावली ते दाखवावे असे विचारले. **श्री. खाकाळ प्रदिप** यांनी कारखान्याचे ड्रेनेज, वृक्षारोपण व रस्त्याचे लाईट दाखविण्याविषयी विचारले. पथदिव्यांच्या संदर्भात आधि सांगितल्या प्रमाणे कारखाना अधिकाऱ्यांनी पथ दिव्यांच्या ऐवजी मंगलकार्यालय बांधण्याबाबत स्पष्ट केले. पुढे विषय बदलत आहे असे निदर्शनास आल्या नंतर श्री. पाटील यांनी सामुहीक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) या साठी वेगळी बैठक घेण्यात यावी असा सल्ला दिला. **श्री. प्रदिप खाकाळ** यांनी ड्रेनेज प्रणालीबद्दल विचारले, त्यावर **श्री. मुथा** यांनी

सांगितले की, त्यांनी त्यांच्या कारखाण्यात सेप्टीक टँक (शोष खडडा ) बसविलेले आहे व ड्रेनेज नाही. सर्व शेतकऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे **श्री. प्रदिप खाकाळ** यांनी सांगितले की, कारखान्यात ड्रेनेज नसल्या कारणाने त्यांच्या विहीरीला घाण पाणी येते. त्यावर **श्री. सुरासे** यांनी सांगितले की गावकऱ्यांच्या उपस्थितीत सगळ्या विहीरींच्या पाण्याचे नमुने गोळा केले जातील, पंचनामा केला जाईल व सदर पाणी तपासले जाईल तसेच त्यांनी पून्हा एकदा स्पष्ट केले की, त्यांनी त्यांच्या लगतच्या कारखान्यात आरओ प्लॉन्ट बसविला आहे ज्यामधुन टिडीएस कमी झाल्यानंतर प्रक्रिया केलेले पाणी वृक्षा रोपणासाठी वापरण्यात येते.

**डॉ. योगिनी बाळखे** यांनी जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समाप्त केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(अ.ज्ञा.मोहेकर)
सदस्य

(प्रकाश अ. पाटील)
अध्यक्ष

(डॉ. योगिनी बाळंखे)
समन्वयक